DELTA CORP LIMITED

31st October, 2025

| National Stock Exchange of India Ltd. | BSE Ltd., |
|---|---|
| Listing Department.<br>Exchange Plaza, C-1, Block- G,<br>Bandra Kurla Complex,<br>Bandra (East) Mumbai–400 051.<br>Fax No. 26598235/8237/8347.<br>**Symbol: DELTACORP** | Corporate Relation Department,<br>Listing Department,<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street, Mumbai – 400 001.<br>FacsimileNo. 22723121/22722037/2041<br>**Scrip Code: 532848** |

Dear Sir/Madam,

**Sub: Newspaper advertisement regarding "100 days Campaign - Saksham Niveshak"**

**Ref: Regulation 30 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

We hereby enclose a copy of the newspaper advertisement published in the following newspapers intimating the shareholders about the commencement of a 100 day special outreach initiative titled 'Saksham Niveshak' which is from 28th July, 2025 to 6th November, 2025, in accordance with campaign launched by Investor Education and Protection Fund Authority (IEPFA) and Ministry of Corporate Affairs (MCA).

a) Financial Express, in English and
b) Loksatta, in Marathi.

You are requested to kindly take the above information on record.

Thanking You,

Yours sincerely,

**For Delta Corp Limited**

Dilip Narendra Vaidya

Digitally signed by Dilip Narendra Vaidya
Date: 2025.10.31 18:19:51 +05'30'

**Dilip Vaidya**
**Company Secretary & Vice President- Secretarial**
**FCS NO.7750**

**Encl.: As above**

## प्रकृतीत दररोज सुधारणा -श्रेयस



**सिडनी :** भारताच्या पुरुष एकदिवसीय क्रिकेट संघाचा उपकर्णधार श्रेयस अय्यरने आपल्या तंदुरुस्तीबाबत सकारात्मक माहिती दिली असून प्रकृतीत दररोज सुधारणा होत असल्याचे गुरुवारी सांगितले.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध शनिवारी (२५ ऑक्टोबर) झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात श्रेयसने ॲलेक्स कॅरीचा उत्कृष्ट झेल पकडला होता. मात्र या वेळी त्याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली. अंतर्गत रक्तस्राव झाल्याने त्याला सिडनीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि अतिदक्षता विभागात (आयसीयू) ठेवण्यात आले होते. मात्र छोटी शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्याची प्रकृती स्थिर झाली आणि त्याला 'आयसीयू'तून बाहेर काढण्यात आले.

''मी दुखापतीतून सावरत असून माझ्या प्रकृतीत दररोज सुधारणा होत आहे. माझ्यासाठी अनेकांनी प्रार्थना केली, शुभेच्छा दिल्या. तुमचा इतका पाठिंबा मिळणे माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. मी सर्वांचा ऋणी आहे,'' असे श्रेयसने 'एक्स'वरील पोस्टमध्ये लिहिले.

### भारत-ऑस्ट्रेलिया दुसरा ट्वेन्टी-२० सामना आज

# पुन्हा पावसाचा व्यत्यय?

**वृत्तसंस्था, मेलबर्न**

**भारत आणि** ऑस्ट्रेलिया पुरुष संघांतील दुसरा ट्वेन्टी-२० सामना आज, शुक्रवारी मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर (एमसीजी) रंगणार असून या वेळीही पाऊस व्यत्यय आणण्याची शक्यता आहे.

जागतिक क्रमवारीत अव्वल दोन स्थानांवर असणाऱ्या या संघांतील पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. मात्र, पहिल्या सामन्यात चाहत्यांचा हिरमोड झाला. कॅनबेरा येथील हा सामना दहाव्या षटकातच रद्द करावा लागला होता. आता शुक्रवारी होणाऱ्या सामन्याच्या वेळीही पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. परंतु हा अंदाज फोल ठरेल अशी दोन्ही संघांच्या चाहत्यांना आशा असेल.

या मालिकेपूर्वी फलंदाज म्हणून सूर्यकुमार यादव याच्यावर कामगिरी उंचावण्यासाठी दडपण होते. कर्णधार म्हणून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सूर्यकुमारला फलंदाजीत सातत्याने अपयश येत होते. मात्र, ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या या मालिकेतील पहिल्या सामन्यात त्याला सूर गवसला. त्याने २४ चेंडूंत नाबाद ३९ धावांची खेळी केली. यात त्याने जोश हेझलवूडच्या गोलंदाजीवर १२५ मीटरचा उत्तुंग षटकार लगावला. तसेच नेथन एलिसविरुद्ध सलग तीन चेंडूंवर दोन चौकार आणि एक षटकार मारला. आता दुसऱ्या सामन्यात पुन्हा दमदार कामगिरी करण्याचा सूर्यकुमारचा प्रयत्न असेल.

पुढील वर्षी होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने या मालिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सूर्यकुमार आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी खेळाडूंना आक्रमक शैलीत खेळण्याच्या सूचना केल्या असून गेल्या काही काळापासून भारतीय संघ सातत्याने अडीचशेहून अधिकची धावसंख्या उभारत आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या सामन्यात ९.४ षटकांचा खेळ झाला, त्यात भारताने १ बाद ९७ धावांची मजल मारली होती. एरवी खेळपट्टीवर स्थिरावण्यासाठी वेळ घेणाऱ्या शुभमन गिलने या वेळी सुरुवातीपासून आक्रमक खेळ केला. पावसामुळे सामना रद्द करावा लागला, त्या वेळी गिल २० चेंडूंत ३७ धावा करून नाबाद होता. मेलबर्न येथील खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल मानली जाते. त्यामुळे पावसाचा अंदाज फोल ठरला आणि ठरल्याप्रमाणे सामना झाला, तर गिलचा पुन्हा फटकेबाज खेळी करण्याचा प्रयत्न असेल. अभिषेक शर्माला पहिल्या सामन्यात १९ धावाच करता आल्या. त्यामुळे त्याचाही मोठ्या खेळीचा मानस असेल.




### पुन्हा 'तोच' संघ अपेक्षित

कॅनबेरा येथे झालेल्या पहिल्या सामन्यात अभिषेक शर्मा, शुभमन गिल आणि कर्णधार सूर्यकुमार यादव या तिघांनाच फलंदाजीची संधी मिळाली. पावसामुळे भारताची गोलंदाजीही आली नाही. त्यामुळे मेलबर्न येथील दुसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघात बदल होणे अपेक्षित नाही. जायबंदी हार्दिक पंड्या या मालिकेसाठी उपलब्ध नसल्याने आठव्या क्रमांकावर फलंदाजी करू शकेल अशा हर्षित राणाला पहिल्या सामन्यासाठी संघात स्थान मिळाले. त्यामुळे भारताचा ट्वेन्टी-२० क्रिकेटमधील सर्वांत यशस्वी गोलंदाज अर्शदीप सिंगला संघाबाहेर बसावे लागले. परंतु आणखी एका सामन्यासाठी त्याला संधी मिळण्याची अपेक्षा नाही.

▮ **वेळ :** दुपारी १.४५ वा. ▮ **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स २, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

## इलमपर्थी भारताचा ९०वा ग्रँडमास्टर



**मुंबई :** चेन्नईचा १६ वर्षीय इलमपर्थी एआर भारताचा ९०वा बुद्धिबळ ग्रँडमास्टर ठरला आहे. त्याने ग्रँडमास्टर किताबासाठीचा अखेरचा तिसरा निकष बोस्निया आणि हर्जेगोव्हिनामधील बिजेल्जिना स्पर्धेत पूर्ण केला.

इलमपर्थीने पहिला निकष २०२३ मध्ये व्हिएतनामच्या हानोई स्पर्धेत, दुसरा निकष सिंगापूरमध्ये, तर २५०० गुणांकन रील्टन चषक स्पर्धेत पूर्ण केले होते. ''इलमपर्थी अतिशय मेहनती मुलगा आहे. त्याच्या पालकांकडून त्याच्यावर कोणतेही दडपण आणले जात नाही, ज्यामुळे त्याच्या प्रगतीस मोठी मदत झाली,'' असे त्याचा प्रशिक्षक ग्रँडमास्टर श्याम सुंदरने सांगितले. इलमपर्थी वेस्टब्रिज आनंद चेस अकादमीचा भाग आहे आणि तो वेलाम्मल शाळेचा विद्यार्थी आहे. जगज्जेता दोम्माराजू गुकेश आणि आर. प्रज्ञानंद यांसारखे आघाडीचे बुद्धिबळपटूही याच शाळेतून घडले आहेत.

# गुकेश कामगिरी उंचावणार?

### विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा आजपासून गोव्यात

**लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी**

**मुंबई :** प्रतिष्ठेच्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेला आज, शुक्रवारपासून गोवा येथे सुरुवात होणार असून या वेळी जगज्जेता दोम्माराजू गुकेश कामगिरी उंचावणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. या स्पर्धेत जगातील २०६ सर्वोत्तम खेळाडू बाद फेरी पद्धतीत खेळतील आणि स्पर्धेतील अव्वल तीन खेळाडू पुढील वर्षीच्या 'कँडिडेट्स' स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

भारताला दोन दशकांहूनही अधिक कालावधीनंतर बुद्धिबळ विश्वचषकाचे आयोजन करण्याची संधी लाभली आहे. भारताने याआधी २००२ मध्ये यजमानपद भूषवले होते, त्या वेळी विश्वनाथन आनंद विजेता ठरला होता. यंदाच्या स्पर्धेत एकूण २४ भारतीय सहभाग नोंदवणार असून यापैकीच कोणी जेतेपद पटकावेल अशी चाहत्यांना आशा असेल.

पाच वेळच्या जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनने या स्पर्धेतून माघार घेतली आहे. हिकारू नाकामुरा आणि फॅबियानो कारुआना यांसारखे आघाडीचे खेळाडूही यंदा खेळणार नाही. त्यांच्या अनुपस्थितीत गुकेश, अर्जुन एरिगेसी, आर. प्रज्ञानंद, अनिश गिरी, वेस्ली सो, व्हिन्सेंट केमर, नोदिरबेक अब्दुसत्तोरोव, इयन नेपोम्नियाशी, रिचर्ड रॅपपोर्ट, विदित गुजराथी, निहाल सरीन यांसारखे खेळाडू जेतेपदासाठी आव्हान उपस्थित करतील. महिला विश्वचषक विजेती दिव्या देशमुखही यावेळी खुल्या गटात सहभाग नोंदविणार आहे.



गुकेश नुकत्याच झालेल्या 'क्लच चेस चॅम्पियन्स' स्पर्धेत अखेरच्या स्थानी राहिला. तीन दिवसांच्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी आघाडी घेतल्यानंतर गुकेशची कामगिरी खालावली आणि त्याची पीछेहाट झाली. कार्लसन विजेता ठरला, तर कारुआना आणि नाकामुरा यांनी अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान मिळवले. चार खेळाडूंच्या या स्पर्धेत गुकेशने कार्लसनविरुद्ध सहापैकी पाच सामने गमावले. मात्र, कार्लसन, कारुआना आणि नाकामुरा हे तिघे विश्वचषकात खेळणार नसल्याचा आपल्याला फायदा मिळू शकेल असे गुकेश म्हणाला. आता तो जगज्जेत्याला साजेसा खेळ करतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## नायर कोलकाता नाइट रायडर्सचे मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** कोलकाता नाइट रायडर्सने गुरुवारी भारतीय संघाचे माजी सहायक प्रशिक्षक अभिषेक नायरला मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी दिली. नायर चंद्रकांत पंडित यांची जागा घेणार आहे. गेले तीन हंगाम पंडित संघाचे मुख्य प्रशिक्षक होते.

नायर २०१८ पासून कोलकाता नाइट रायडर्स संघासोबत आहेत आणि संघ व्यवस्थापनाच्या महत्त्वाच्या सदस्यांपैकी एक आहे. नायर जवळपास नऊ महिने भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासह सहायकांमध्ये सहभागी होते. कोलकाताचा सहायक प्रशिक्षक म्हणून आपल्या कार्यकाळात नायरने अनेक युवा खेळाडूंच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## पुणेरी पलटणसमोर दबंग दिल्लीचे आव्हान

**नवी दिल्ली :** दबंग दिल्ली आणि पुणेरी पलटण संघ प्रो-कबड्डी लीगच्या १२व्या हंगामाच्या अंतिम सामन्यात आज, शुक्रवारी जेतेपद मिळवण्यासाठी एकमेकांसमोर असतील.

## कोटियनची फिरकी प्रभावी

**बंगळूरु :** जॉर्डन हरमान (७१) आणि जुबैर हमजा (६६) यांच्या शतकी भागीदारीनंतर तनुष कोटियनच्या (४/८३) नेतृत्वाखाली भारतीय 'अ' संघाच्या फिरकीपटूंनी केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे दक्षिण आफ्रिका 'अ' संघाला चार दिवसांच्या अनौपचारिक कसोटी सामन्यात पहिल्या दिवसअखेर ९ बाद २९९ धावसंख्येपर्यंत मजल मारता आली. दक्षिण आफ्रिका 'अ' संघासाठी हरमान आणि हमजा यांनी दुसऱ्या गड्याकरिता १३२ धावांची निर्णायक भागीदारी रचली.

**BANK REQUIRES COMMERCIAL PREMISES**

Leading Scheduled Co-op Bank invites Proposals for premises on rental basis of carpet area 1100 to 1200 sq.ft.approx.on Gr.Floor at

**Kannamvarnagar VIKROLI East** Mumbai 400083

**MALAD West** nearby Janakalyan Nagar Mumbai 400095

**JUHU** nearby Link Road Mumbai 400049

**NEW PANVEL** 410206

carpet area 6500 to 7000 sq. ft. approx. on Gr.Floor & 1st Floor at

**GHATKOPAR** East or West Nearby Station

Interested owners may mail their proposals within 07 Days from the date of publishing of this advertisement on below mentioned Email : **property@jksbl.com** Bank reserves it's rights to accept or reject any offer without assigning any reason. Brokers will not be entertained.

**मध्य रेल्वे**

**एएलएस रुग्णवाहिकांची भरती**

**निविदा सूचना क्र. जीईएम/२०२५/बी/६८३१९०४**

**कामाचे वर्णन:** माटुंगा वर्कशॉप कर्मचाऱ्यांसाठी टाइप डी, एएलएस (ॲडव्हान्स्ड लाइफ सपोर्ट) रुग्णवाहिकेची भरती. **परिमाण:** दर वेळापत्रकानुसार. **निविदा बंद होण्याची/ उघडण्याची तारीख आणि वेळ:** १९.११.२०२५, स. ०९.०० वा.पर्यंत. निविदा तपशील आणि निविदा कागदपत्रे वेबसाइट **www.gem.gov.in** यावर उपलब्ध आहेत. वेबसाइटद्वारे फक्त ई-निविदा स्वरूपात निविदा स्वीकारल्या जातील.

उप मुयांअ(I) 606

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**

**बलास्टचा साठा आणि पुरवठा**

**खुली निविदा सूचना क्र.: डीवायसीईसीपीएनव्हीएल, २०२५-०१**

**दिनांक : २४.१०.२०२५**

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्यावतीने उपमुख्य अभियंता (सी.) दादर@पनवेल, ओरियन मॉलच्यामागे, बालाजी अंगण इमारतसमोर, ४था मजला, जुना पनवेल, जिल्हा (रायगड)- ४१०२०६ हे खालील कामांसाठी सुस्थापित कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करीत आहे: **१. कामाचे नाव:** निळजे-कोपर कॉर्ड लाइन आणि पेण डोलवी पँच डबलिंग कामासाठी ट्रॅक बलास्ट क्र. आयआरएस जीई-१, फेब्रुवारी २०२३ यासाठी आरडीएसओ स्पेसिफिकेशननुसार बलास्टचा साठा आणि पुरवठा. **२. अंदाजित मूल्य:** रु. ७.४१ कोटी अंदाजे **३. इसारा ठेव अनामत:** रु. ५,२०,७००/-, **४. पूर्णत्वाचा कालावधी:** पावसाळ्यासह ०६ (सहा महिने). **५. निविदा कागदपत्रांची उपलब्धता:** वरील कामासाठी निविदा कागदपत्रे वेबसाइट **www.ireps.gov.in** यावर उपलब्ध आहेत. **६. निविदा सादर करण्याची आणि उघडण्याची तारीख आणि वेळ :** सर्वप्रकारे योग्यरित्या पूर्ण केलेले ई-निविदा दि. १७.११.२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत वरील वेबसाइटवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अपलोड करावेत.

**डीवाय. सीई(सी), दादर@पनवेल** 605

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे वतीने, क्षेत्रीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कामांसाठी ई-खुली निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **कामाचे नाव:** कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत सावंतवाडी स्थानकावर प्रवासी लिफ्ट (०२) चा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे (26 प्रवासी लिफ्ट/1768 किलो/1 स्पीड/2 मजले/2 थांबे स्टेनलेस स्टील (1.5 मिमी) कार केबिन) आरडीएसओ मान्यता आणि तपशीलानुसार. **निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/ईएल/8ए/2025, तारीख : 31.10.2025. अंदाजे किंमत:** रु. 85,76,272/- (जीएसटी वगळून). **निविदा फॉर्म किंमत:** शून्य. **ईएमडी:** रु. 1,71,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे). **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** 21.11.2025, दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी, वरिष्ठ प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधा किंवा रेल्वे वेबसाइट (**www.ireps.gov.in**) ला भेट द्या.

**डेल्टा कॉर्प लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय: डेल्टा हाऊस, प्लॉट क्र. १२, हॉर्नबाय वेलार्ड इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, कॉपर चिमणीशेजारी, वरळी, मुंबई - ४०००१८.
सीआयएन क्र.: L65493MH1990PLC436790 दूरध्वनी क्र.: ९१-२२-४०७९४७००
ईमेल आयडी: secretarial@deltin.com वेबसाईट: www.deltacorp.in

**सूचना**

**१०० दिवसांची मोहीम - 'सक्षम निवेशक' - न भरलेले/दावा न केलेले लाभांश गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी ("आयईपीएफए") मध्ये हस्तांतरित होऊ नयेत याकरिता केवायसी आणि इतर संबंधित अपडेट्स आणि भागधारकांच्या सहभागासाठी**

डेल्टा कॉर्प लिमिटेड ("तुमची कंपनी") च्या भागधारकांना सूचना देण्यात येते की, गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण ("आयईपीएफए"), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") च्या दिनांक १६ जुलै २०२५ रोजीच्या पत्रानुसार, तुमच्या कंपनीने दि. २८ जुलै २०२५ ते दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत १०० दिवसांची **"सक्षम निवेशक"** मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान सर्व भागधारक, ज्यांनी त्यांच्या लाभांशावर दावा केलेला नाही किंवा त्यांचे केवायसी आणि नामनिर्देशन तपशील अद्ययावत केलेले नाहीत किंवा ज्यांना दावा न केलेल्या लाभांश आणि समभागांशी संबंधित कोणत्याही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, ते कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट ("आरटीए") म्हणजेच मेसर्स पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांना त्यांचा पत्ता: युनिट क्रमांक ९, शिव शक्ती इंडस्ट्रीज एस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परळ (पूर्व) मुंबई - ४०० ०११ येथे पत्र लिहू शकतात किंवा ई-मेल आयडी: support@purvashare.com दूरध्वनी: ०२२ ४१३४ ३२५५, वेबसाइट www.purvashare.com आणि कंपनीला पुढील ई-मेल आयडी: secretarial@deltin.com वर पाठवावा लागेल. भागधारकांनी पुढे नोंद घ्यावी की, ही मोहीम सक्रियपणे आणि विशेषतः भागधारकांपर्यंत त्यांचे केवायसी, बँक आदेश, नामनिर्देशन आणि संपर्क माहिती इ. अद्ययावत करण्यासाठी आणि त्यांचे समभाग आणि लाभांश रक्कम आयईपीएफएकडे हस्तांतरित होण्यापासून रोखण्यासाठी त्यांच्या न भरलेल्या/न दावा केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे.

**डेल्टा कॉर्प लिमिटेड करिता**
**सही/-**
**दिलिप वैद्य**
**कंपनी सचिव आणि उपाध्यक्ष - सचिवीय**
**एफसीएस क्र. ७७५०**

**दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०२५**
**स्थळ: मुंबई**

**पालघर नगरपरिषद, पालघर**

**ता. पालघर, जि. पालघर पिन ४०१ ४०४**

**ई–निविदा सूचना**

मुख्याधिकारी, पालघर नगरपरिषद, पालघर नगरपरिषदेच्या निवडणूक विभागाच्या कामासाठी शासनाकडील आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून / सेवा पुरवठादाराकडून ई–निविदा मागवित आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म **www.mahaetenders.gov.in** या संकेतस्थळावर दि. ३१.१०.२०२५ ते दि. ०७.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. तसेच वैध ई–निविदा दि. ०८.११.२०२५ दुपारी १२.१० वाजता पासून उघडण्यात येतील.

सही/–
**मुख्याधिकारी**
पालघर नगरपरिषद

**जा.क्र. पानप/निवडणूक/कार्या–८४७/२०२५–२६**
**दिनांक : ३०.१०.२०२५**

**SEBI**
भारतीय प्रतिभूति और विनिमय बोर्ड
Securities and Exchange Board of India

**भरती- २०२५**

**जनरल लीगल, माहिती तंत्रज्ञान, संशोधन, अभियांत्रिकी (विद्युत), अभियांत्रिकी (स्थापत्य) आणि अधिकृत भाषा शाखांमध्ये श्रेणी ए अधिकाऱ्यांच्या पदासाठी अर्ज**

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सेबी) हे प्रतिभूतींमधील गुंतवणूकदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे, सिक्युरिटीज मार्केटच्या विकासाला प्रोत्साहन देणे व त्याचे विनियमन करणे यासाठी संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन केलेले वैधानिक मंडळ आहे. जनरल, लीगल, माहिती तंत्रज्ञान, संशोधन, अभियांत्रिकी (विद्युत), अभियांत्रिकी (स्थापत्य) आणि अधिकृत भाषा शाखांमधील श्रेणी ए अधिकाऱ्यांच्या पदावर भरती करण्याकरिता भारतीय नागरिकांकडून सेबी अर्ज मागवीत आहेत.

**३० ऑक्टोबर २०२५ पासून २८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज ऑनलाइन भरता येतील.**

सविस्तर जाहिरात व ऑनलाइन अर्ज प्रपत्र यासाठी सेबी वेबसाइटला https://www.sebi.gov.in/sebiweb/AboutAction.do?doVacancies=yes येथे भेट द्या.

सीबीसी१५२०४/११/०१७५/२५२६

**MAHARASHTRA MEDICAL COUNCIL, MUMBAI**

**(Established by Government of Maharashtra Under MMC Act 1965)**

189-A, Anand Complex, 1st Floor, Sane Guruji Marg, Arthur Road Naka, Chinchpokali (West), Mumbai - 400011. Tel.: 022-23007650

**Email: maharashtramcouncil@gmail.com • Website: www.maharashtramedicalcouncil.in**

No. MMC/Renewal Notice/2025/06052 Date: 30/10/2025

**NOTICE**

(MMC Act, 1965 Section 23)

**(This Notice of Renewal is applicable only for the Registered Medical Practitioners who have been registered themselves during the period 01.01.2021 to 31.12.2021)**

As per the directions of Dr. Vinky Rughwani, Hon'ble Prashasak, Maharashtra Medical Council, notice is hereby issued to all 8,842 Registered Medical Practitioners whose names were entered in the Medical Register between **01.01.2021 to 31.12.2021** under the provisions of the *Maharashtra Medical Council Act, 1965*, to take note of the following:

All such practitioners, except those holding provisional registrations and those who have already renewed their registration, are hereby required to submit an online application for renewal of registration in accordance with Section 23(a) of the *Maharashtra Medical Council Act, 1965 and its Amendment Act, 2003.*

The online renewal application form is available on the Maharashtra Medical Council website: **www.maharashtramedicalcouncil.in**

As per Chapter 1, Clause B, Sub-Clause 1.2.3 of the *Indian Medical Council (Professional Conduct, Etiquette and Ethics)* Regulations, 2002, every Registered Medical Practitioner is required to earn 30 credit hours every five years through participation in CME programmes, workshops, conferences (national/international), or online CME modules.

Please note that no individual notice will be issued to practitioners for renewal of registration. Registered Medical Practitioners who fail to apply for renewal within the prescribed period shall be liable for legal and regulatory action as per the provisions of the Act.

Upon receipt and verification of the required documents at the Maharashtra Medical Council office, the registration will be duly renewed.

**Sd/-**
(Dr. Rakesh Waghmare)
**Registrar**
Maharashtra Medical Council










**नाटक**
**सिनेमा**
**वाद्यवृंद**

